International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.3 No.6 July – Aug 2016

# असंघटित क्षेत्रातील परित्यक्ता स्त्रियांच्या चळवळी

डॉ.उषा पाटील
*समाजशास्त्र विभाग*
*महावीर कॉलेज, कोल्हापूर*

**प्रस्तावना :**

देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे. विकासाच्या बाबतीत शासकीय पातळीवर आणि एकूणच सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांना विषमतेला सामोरे जावे लागले आहे. ब्रिटीश कालीन समाजात स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा विचार करता असे आढळून येते की, ब्रिटीशांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. मानवता व उदारमतवादीपणा या आधारावर समाजात समानता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. सती प्रथा, बालविवाह, पडदापध्दती या विरोधात इंग्रज सरकारने कठोर कायदे केले होते. स्त्री पुरुष यांच्यामध्ये सर्वच बाबतीत जे अंतर होते जी दरी होती ती भरुन काढण्याचा प्रयत्न ब्रिटीश राजवटीत झाला. याच काळात स्त्रियांना आपल्या दास्याची जाणीव होऊ लागली होती. स्त्रियांना काही माणुसकीचे व काही नागरिकत्वाचे अधिकार मिळाले. स्त्रिच्या व्यक्तिगत जीवनाला, कर्तृत्वाला थोडीफार प्रतिष्ठा मिळाली. अनेक विविध घटनांचा परिपाक म्हणून मुलींना प्रथम प्राथमिक शाळेची मग माध्यमिक शाळेची व नंतर महाविद्यालयाची दारे उघडली गेली. पं.ईश्वरचंद विद्यासागर, म. जोतिबा फुले, म.कर्वे, आगरकर, ह.ना.आपटे इ.अनेक नेत्यांनी सतत सभा, लिखाण इ.मार्गांनी समाजाला जागे करण्याचे कार्य केले. स्त्री शिक्षणाची सुरुवात इथूनच झाली.

छ.शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करुन स्त्रियांवर होणा—या अन्यायाच्या विरोधात कायदे केले. स्त्री शिक्षणाबरोबर जरठकुमारी विवाह, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह इ.संबंधी जागृतीचा प्रयत्न केला गेला. न्या.रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकहितवादी, म. फुले, आगरकर या सारख्या अनेकांच्या प्रयत्नांनी स्त्रियांच्या उत्कर्षाच्या वाटा खुल्या झाल्या. तात्कालीन समाज व्यवस्थेत विरोध न जुमानता स्त्री शिक्षण, विधवा विवाह, केशवापन निषेध, बालविवाहास विरोध यासारखी कामे करुन स्त्रियांच्या उध्दाराच्या कार्यास हातभार लावला. पुरुषांची प्रेरणा आणि खडतर मार्गावरुन चालण्याची काही स्त्रियांनी दाखविलेली जिद्द वाखण्यासारखीच होती. उदाहरणच घ्यायचे झाले तर पंडिता रमाबाई यांनी पुण्याजवळील केडगांव याठिकाणी शारदा सदन ही स्वयंसेवी संस्था स्थापून स्त्रियांच्या

उध्दांरासाठी कार्य करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील ज्या स्त्रियांना शिक्षण घेण्याची, सामाजिक कार्यात किंवा राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली, त्यांनी अतिशय तळमळीने मिळालेल्या संधीचा उपयोग स्वत:साठी आणि स्त्रियांच्या जागृतीच्या कार्यासाठी करुन घेतला. समाज सुधारक स्त्री पुरुषांनी स्त्रियांच्या मध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्याचे काम केले. पंडिता रमाबाई, यशोदाबाई भट, येसूताई सावरकर, पारुबाई दास्ताने, पार्वतीबाई ठकार, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले या तात्कालीन स्त्रियांनी समाजातील इतर स्त्रियांच्या कल्याणासाठी त्यांच्यावर होणा—या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पुढाकार घेतला.१९ व्या शतकातील स्त्रियांची चळवळ स्त्रियांना काही हक्क मिळाले पाहिजे या विचाराभोवती उभारली गेली. समाजसुधाकांनी समाज आधुनिक करण्याचा जो प्रयत्न केला त्यातून स्त्री विषयक सुधारणा झाल्या. १८८९पासून स्त्रियांमध्ये स्फूर्ती आणि उत्साह निर्माण होऊ लागला. स्त्री शिक्षणापासून सुरु झालेली चळवळ जोर धरु लागली. स्त्रियांच्या पहिल्या तेजस्वी नेत्या पंडिता रमाबाई स्त्रियांसाठी अतिशय तळमळीने, खंबीरपणे कार्य केले. ठिकठिकाणी सभा घेऊन त्या प्रचार कार्य करीत असता शारदासदन या संस्थेची स्थापना त्यांनीच केली स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे शारदासदन या प्रमाणेच आर्य महिला समाज, सेवा सदन, लेडिज होम क्लब, हिंद सेविका संघ अशा विविध संस्था स्थापन झाल्या. याद्वारे स्त्री शिक्षणाच्या व स्त्री उन्नतीच्या कार्याला संस्थात्मक रुप आले.

१९२० पासून स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होऊ लागल्या. सत्याग्रह, प्रभात फे—या, राजकीय सभा, निदर्शने यातील स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणात दिसू लागल. चळवळीत भाग घेण्यासाठी स्त्रियांनी घरात मोठया प्रमाणात बंडखोरी केल्याचे आढळते. एका अर्थाने त्यांची पावली स्त्री मुक्तीच्या मार्गावर पडत होती. विविध चळवळीच्या निमित्याने स्त्रिया संघटित होऊन विविध लढयांना सामो—या जात होत्या. आणि त्यातूनच त्यांच्यासाठीच्या विकासाचीही नांदी होती, असे म्हणायला काही हरकत नाही.

१९१८ ते १९२३ या काळात स्त्री मताधिकाराची चळवळ झाली. त्यातही अनेक स्त्रियांचा सहभाग होता. रमाबाई रानडे या चळवळीच्या प्रमुख आधार स्तंभ होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीच्या माणूस म्हणून जगण्याच्या हक्काला अधिमान्यता मिळाली. स्त्रीला आत्मभान आणि समाज भान ही आलेत्र १९७० सालापासून साधारणत: स्त्री प्रश्नाचे भान येऊ लागले. असे मानले तर अनेक आघाडयांवर स्त्रीयांच्यात जाणीव जागृती झाली असे म्हणता येईल. त्याही काळात नोकरी करणा—या स्त्रियांची संख्या देखील लक्षणिय होती. अशा नोकरी करणा—या स्त्रियांच्याही काही समस्यांवर होत्या. या समस्या मात करणा—यासाठी स्त्रिया मोठया प्रमाणात संघटीत झाल्या व एकत्र घेऊन लढा दिला. त्यामुळेच त्यांना बाळंतपणाची हक्काची रजा, पाळणाघराची सोय, प्रसाधान गृह इ. मागण्या केल्या गेल्या. याचा परिणाम

म्हणून काही बाबतीत सुधारणा झाली आणि सर्वच प्रयत्न मोलाचे असले तरीही ते अंशात्मकच आहेत. अजूनही स्त्रियांची असुरक्षितता आणि निष्कृष्ठ दर्जाचे काम यात फारसा बदल झालेला नाही. कुटुंबातर्गत होणारा शारीरिक आणि मानसिक छळ यापासून मुक्तता झालेली नाही. जुनी कुटुंब व्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था यात झपाटयाने बदल होत आहे. त्यामुळे खेडी, शहरे, शेती नोकरी, एकत्र कुटुंब, विभक्त कुटुंब, कुटुंबाचे हित व्यक्तीच्या आकांक्षा अशी द्विधा मनस्थिती निर्माण झाली आहे. स्त्रिया घरात आणि घराबाहेर जे जे काम करतात त्यामुळे अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असणारी सामाजिक संरचना दृढ केली जाते. हयातून स्त्रियांचे दुय्यम स्थान पक्के होते. स्त्रिया अनेक त–हेचे उत्पादक काम करतात. तरी स्त्रियांचे भांडवलावर नियंत्रण नाही ज्ञान, संपत्ती, कला,कौशल्य, साधनसामुग्रीच्या व अशा कोणत्याही गोष्टीवर त्यांचा हक्क नसतो.१९६४ ते १९७५ या काळात हळूहळू वाढणारा स्त्रियांचा असंतोष १९७५ च्या सुमारास आंतरराष्ट्रीय स्त्री वर्गाच्या संदर्भात स्फोटक स्वरुपात व्यक्त होऊ लागला. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांचा पाश्यात्य स्त्री मुक्तीवादी चळवळींशी व विचारांशी संपर्क येऊ लागला.

स्त्रियांच्या विविध समस्या, त्या जर संघटित झाल्या तर सुटू शकतात. तसेच शहरी भागात काही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यांच्या मार्फत सुध्दा महिलांच्या समस्या सोडवणूकीसाठी प्रयत्न केले जातात. परित्यक्ता महिला व त्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळया सेभाभावी संस्थांनी केलेली मदत या विषयीचे विवेचन या शोध निबंधात करण्यात येणार आहे. हे विवेचन करण्यापूर्वी आपणाला प्रथम परित्यक्ता कोणाला म्हणावयाचे किंवा परित्यक्ता म्हणजे कोय? हे प्रथम समजून घेतले पाहिजे. या उद्देशाने पुढील स्पष्टीकरणे –

**परित्यक्ता स्त्रिया :**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील परित्यक्ता स्त्रियांचा लढा स्त्री मुक्ती मोर्चाने सुरु झालेला होता. तसेच दारुशी निगडीत घरगुती गोष्टीकडे संपूर्ण दुर्लक्ष करणा–या वृत्तीला या मोर्चातून प्रचंड विरोध केला त्यातून दारु पिऊन अत्याचार करणा–याविरुध्द आवाज उठवला. १९८८ पासून परित्यक्ता स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून गेल ऑम्वेट, इंदूताई पाटणकर, निशा शिवुरकर या सारख्या कार्यकर्त्यांनी, मुंबई, पुणे, सांगली, संगमनेर, औरंगाबाद, नाशिक या ठिकाणी मोठया प्रमाणात चळवळी केल्या होत्या. परित्यक्त्यांना सन्मानाने जगता यावे हा या चळवळी मागील हेतू होता.

परित्यक्ता म्हणजे नव–याने टाकून दिलेली स्त्री होय. त्या स्त्रिया स्वत:ची अशी कोणतीही गंभीर चूक नसताना नवरा तिला सोडून देतो. कायद्याने संमत नसलेला, पण स्वयंनिर्मित असा लग्नविच्छेद असे आपणाला फार तर म्हणता येईल.

नव–याने सोडून दिलेल्या स्त्रीचे परित्यक्ता हे एक सामाजिक नाव आहे. नव–याचा बाहेरख्यालीपणा, नव–याकडून होणारी सततची मारहाण, नव–याची व्यसनधिनता आणि नव–याचा संशयी स्वभाव हया कारणामुळे प्रामुख्याने विवाहित स्त्री परित्यक्ता बनते. हया परित्यक्ता स्त्रिया अडाणी, निरक्षर आहे. नव–याने सोडल्यानंतर हया स्त्रियांना एक प्रकारे मानहानीचे जीवन जगावे लागते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे उदरनिर्वाहासाठी मजूरी करण्यापलिकडे पर्याय राहत नाही. अतिशय अल्प मजुरीवर जीवन जगावे लागते. मिळणा–या पैशात कुटुंबाच्या गरजा भागत नाहीत. बरं नव–याने सोडून दिले म्हणून माहेरी जायचे म्हटले तरी भाऊ लग्नाला आलेला असतो. बहिणीचे अजून लग्न व्हावयाचे असते. त्यामुळे काय करायचे हा एक मोठा प्रश्न नव–याने सोडलेल्या स्त्रियांपुढे उभा राहतो.

नवरा सोडून देताना फक्त बायकोलाच सोडून देत नाहीत तर तिच्या बरोबर मुलांचा पण तो त्याग करतो. मुलांच्या चांगल्या भविष्याची स्वप्न उराशी बाळगून ही परित्यक्ता स्त्री अतिशय दयनीय असे जीवन जगत असते. नव–याने सोडून दिले आणि माहेरी सुध्दा आधार मिळाला नाही तर अशा परित्यक्ता स्त्रियांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. उत्पन्न कमी आणि जबाबदारी जास्त अशा विचित्र मानसिकतेमध्ये ही परित्यक्ता स्त्री जीवन जगत असते.

परित्यक्ता स्त्रियांना नव–याने सोडल्यानंतर पोटगी मिळू शकते. अशी कायदेशीनर तरतूद आहे. पण सासरी माहेरी दोन्हीकडील आर्थिक परिस्थिती हालाखिची असेल तर आर्थिक मदत कोणाकडूनही मिळत नाही. नव–यावर पोटगीचा दावा लावला तर तो ब–याचदा कोर्टात हजर राहत नाही. आपले उत्पन्न खुपच कमी असल्याचे सांगतो. परित्यक्ता स्त्रियांनाही आपल्या नव–याची आर्थिक स्थिती माहित असते. म्हणून त्या पण पोटगीची अपेक्षा करत नाहीत. आणि एक, दोन दिवसाची मजुरी बुडवून कोर्टात जाणे त्यांना नको वाटते. कारण सुट्टी काढल्यानंतर काम होईलच याची खात्री नसते. पोटगी ही नियमित दिली जात नाही. त्यामुळे अशा स्त्रियांसमोर आर्थिक ओढाताण फार असते. परित्यक्तांना सामाजिक परंपरा व रुढीतून निर्माण होणा–या मनस्तापास व पुरुषांपासून असलेल्या धोक्यातून उदभवणा–या असुरक्षिततेस सामोरे जावे लागते.

संशोधनाच्या निमित्याने परित्यक्ता महिलांच्या प्रश्नाकडे मुद्दामच लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण महाराष्ट्रातील परित्यक्ता हिंदू महिलांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीची पाहणी करुन वस्तूस्थिती मांडणे आणि त्यांच्या पूनर्वसनाच्या दृष्टीने काही उपाय सुचविणे असा प्रयास संधोनात केला आहे.

**अध्ययनाचे उद्देश :**

१) विवाहिता परित्यक्ता बनवण्याची कारणे अभ्यासणे

२) परित्यक्ता महिलांची माहेरची आणि सासरची पार्श्वभूमी अभ्यासणे

३) परित्यक्ता महिलांचे सामाजिक जीवन अभ्यासणे

४) स्वयंसेवी संस्था, चळवळी यामध्ये परित्यक्तांचा सहभाग अभ्यासणे

५) परित्यक्तांच्या पूनर्वसनाच्या उद्देशाने केलेल्या शासकीय उपाययोजनांचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती :**

संशोधन पध्दतीतील महत्वपूर्ण अशा प्राथमिक तथ्य् संकलनाच्या आधारे मुलाखत अनुसूची व निरीक्षण याद्वारे माहिती संकलित करण्यात आलेली आहे. तसेच वृत्तपत्रे, मासिके, संदर्भिय पुस्तके इ.च्या आधारे माहिती मिळविली आहे.

**अध्ययन क्षेत्र :**

दक्षिण महाराष्ट्रातील परित्यक्ता हिंदू महिलांच्या समाजशास्त्रीय अभ्यास या संशोधन विषयाचय अनुषंगाने दक्षिण महाराष्ट्रातील तीन जिल्हयातील एकूण १७ गावे निवडण्यात आली. या १७ गावात ५० पेक्षा जास्त महिला परित्यक्ता होत्या. तसेच कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तिन्ही शहरातील परित्यक्ता स्त्रियांची निवड करण्यात आली. एकूण १९२ परित्यक्ता स्त्रियांच्या मुलाखती १९९९ ते २००१ या कालावधीत संशोधन करण्यात आले.

संधोधना अंती असे आढळून आले की, विवाहिता प्रामुख्याने चार कारणामुळे परित्यक्ता बनते.

**१)पतीचे व्यसन :**

१९२ परित्यक्ता महिलांपैकी १२५ (६५.१:) परित्यक्ता महिलांच्या पतींना दारुचे व्यसन आहे. ब—याच परित्यक्ता स्त्रिया या आपल्या पतीच्या दारुच्या व्यवसानामुळे त्यांना सोडून माहेरी निघून येतात.

**२)मारहाण :**

मारहाण करण्याच्या कारणामुळे १३९ (७२.४०:) परित्यक्ता महिलांना आज परित्यक्ता म्हणून जीवन जगावे लागत आहे. मारहाण ही इतक्या गंभीर स्वरुपाची होती की यातून स्त्रिया कायमच्या अपंग बनल्या आहेत. मारहाणीमध्ये दात पाडणे, मोठया प्रमाणावर शारीरिक इजा पोहचविणे, ब—याचदा मारहाणीमध्ये गर्भपातही होत असे. पती पत्नीला इलेक्ट्रीक शॉकही देऊन त्रास देत असे. अतिशय निदर्यतेने

आणि क्रुरतेने मारहाण केली जाते. जबर मारहाणीमुळे ब—याच स्त्रिया शारिरीक दृष्टया अशक्त, अकार्यक्षम बनल्या आहेत.

**३)पतीच्या बाहेरख्यालीपणा :**

पतीच्या बाहेरख्यालीपणा हे कारण ११७ (६०.९:) परित्यक्तांच्या बाबतीत आहे. लग्नाची पत्नी घरी असून सुध्दा इतरत्र अनैतिक संबंध सर्रास ठेवले जातात. इज्जत, अब्रूची तमा न बाळगता पती हा बाहेर रख्यालीपणाने जीवन जगताना आढळतो. हे अनैतिक संबंध नात्यामध्येही आहेत किंवा नात्याच्या बाहेरही असलेले आढळतात.

**४)पतीच्या संशयी स्वभाव :**

संशय घेणा—या पतीचे प्रमाण कमी असले तरी पतीच्या संशयी स्वभावामुळे महिलांवर परित्यक्ता बनण्याची वेळ आली आहे. चारित्र्यावर संशय घेतला जातो. इतर महिलांशी बोलणे,कोणाकडे तरी बघून हसली, अशा बारीक सारीक कारणांवरुन संशय घेतला जातो. या संशयाचे पर्यवसन मारहाणीत होते आणि त्यातून स्त्रियांना परित्यक्तापणाचे जीवन जगावे लागते.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी वेगवेगळया सेवाभावी संस्थांनी परित्यक्ता स्त्रियांच्या समस्येला वाचा फोडण्याचे कार्य केले आहे. आंदोलन, मेळावे, परिषदा, चर्चासत्रे, बैठका, तर कधी शासनाला घेराव इ. मार्गानी परित्यक्ता स्त्रियांच्या हक्कासाठी लढा दिल्याचे आढळते. या संदर्भात कालानुक्रमे झालेल्या घटना सारणीमध्ये मांडलेल्या आहेत. महाराष्ट्रातील परित्यक्ता स्त्रियांची चळवळ कालानुक्रमे घटना :

| अ.क्र. | दिनांक | स्वरुप | संघटक | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ८ मार्च १९८७ | मेळावा | समता आंदोलन | संगमनेर |
| २ | २० मार्च १९८७ | अधिवेशन | समता आंदोलन | संगमनेर |
| ३ | २ सप्टेंबर १९८८ | अधिवेशन | स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ | विटा |
| ४ | ऑक्टोंबर १९८८ | शिबीर | महिला हक्क संरक्षण | नाशिक |
| ५ | ७/८ जानेवारी १९८९ | अपराजिता एकटया स्त्रियांचे अधिवेशन | नारी समता मंच | पुणे |
| ६ | १६ फेब्रुवारी १९८९ | जिल्हयाधिकारी कार्यालयासमोर धरणे | स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ आणि परित्यक्ता आंदोलन | सांगली |
| ७ | ३ जुलै १९८९ | अधिवेशन | श्रमिक महिला समिती | पुणे |
| ८ | ७/८ जुलै १९८९ | चर्चासत्र | स्त्रीमुक्ती आंदोलन समिती | |
| ९ | ऑगस्ट १९८९ | अधिवेशन | भारतीय महिला फेडरेशन | कोल्हापूर |
| १० | २७ सप्टेंबर १९८९ | अधिवेशन | समाजवादी महिला सभा | सिंदरखेड |
| ११ | ५ ते ७ मार्च १९९० | जिल्हाधिकारी बरोबर बैठक | | सांगली—विटा—इस्लामपुर |
| १२ | १४/१५ एप्रिल १९९० | अधिवेशन | महिला दक्षता समिती समाजवादी महिला सभा | मुंबई |

| अ.क्र. | दिनांक | स्वरुप | संघटक | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १३ | ५ ते १९९० | जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा | समता आंदोलन | अहमदनगर |
| १४ | जून १९९० | जिल्हाधिकारी बरोबर बैठक | समता आंदोलन | अहमदनगर |
| १५ | १/२ नोव्हेंबर १९९० | स्त्री जागृती शिबीर | स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ | कासेगाव |
| १६ | ११ डिसेंबर १९९० | विधान सभेवर मोर्चा | समाजवादी महिला सभा | नागपूर |
| १७ | जानेवारी १९९१ | मुख्य मंत्र्याबरोबर बैठक | समाजवादी महिला सभा | नागपूर |
| १८ | १०/१५ मार्च १९९१ | मुंबईकडे मोर्चा | समता आंदोलन | संगमनेर |
| १९ | १५ डिसेंबर १९९३ | विधान सभेवर धरणे | समाजवादी महिला सभा | नागपूर |
| २० | १९ जानेवारी १९९४ | विभागीय परिषद | महिला दक्षता समिती भारतीय महिला फेडरेशन | कोल्हापूर |
| २१ | ३० जानेवारी १९९४ | परित्यक्ता हक्क परिषद | सोशॉलिस्ट फ्रंट, मुस्लिम सत्यशोधक समाज | औरंगाबाद |
| २२ | ३०/३१ जुलै १९९४ | परिषद | वंचित विकास | पुणे |
| २३ | २६/२७ नोव्हेंबर १९९४ | परिषद | वंचित विकास | पुणे |
| २४ | २०/२१ नोव्हेंबर १९९४ | परित्यक्ता परिषद | वंचित विकास | पुणे |

सन २००१ ते २०१० या दशकात परित्यक्ता महिलांच्या संदर्भात विशेषत्वाने अभ्यास करण्यात मागील दशकात महाराष्ट्रातील विविध ठिकाणी ज्या चळवळी झाल्या होत्या. त्याची पुढील वाटचाल काय असावी. परित्यक्ता महिलांच्या प्रश्नांच्या बाबतीत नेमकी कोणती पावले उचलावीत. यासाठी सोपेकॉम, पुणे ही सेवाभावी संस्था, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स मुंबई, स्त्री आधार केंद्र, पूणे विद्यापीठ तसेच स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ, कासेगाव संस्थामधील संशोधकांनी विविध कालावधीत परित्यक्ता स्त्रियांच्या समस्यांची तीव्रता तपासण्याचा प्रयत्न केला गेला, तेव्हा असे आढळून आले की,कालावधी कोणताही असला तरी समस्येच्या बाबतीत समानता आहे. कारणे तीच, परिस्थितीही तीच, समस्येची तीव्रता अजून ही कमी झालेली नाही. पण सन २०१० या दशकात समाप्तीमध्ये एक गोष्ट परित्यक्ता महिलांच्या बाबतीत चांगली झालेचे आढळते. ती म्हणजे श्रमिक मुक्ती दलाच्या माध्यमातून ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक इंदूताई पाटणकर यांनी महिलांच्या वेदनेला आवाज दिला. याचा प्रयत्नातून सांगली जिल्हयात बहे गावालगत परित्यक्यांच एक आगळी वेगळी वस्ती उभी राहिली. अशा महिलांनी एकत्र येणे आणि आपली हक्काची वस्ती तयार करणे हाच कमालीची जिद्द व चिकाटीचा कस पाहणारा वळणावळणाच्या संघर्षाचा प्रवास आहे.

श्री.संजय थोरात यांच्या आत्मप्रतिष्ठेसाठी परित्यक्तांचा हुबाळवाडीत लढा या शीर्षकाचा दै.सकाळ मध्ये दि.३० ऑगस्ट २०१० रोजी प्रसिध्द झाला होता. सांगली जिल्हयात एकटया राहणा—या महिलांचा

आदर्श गृहप्रकल्पासाठी बहे गावालगत हुबाळवाडी येथील सरकारी मालकीच्या जमीनीत जागा देण्यात आली. महिलांना सात—बाराचे उतारे मिळाले. जागा ताब्यात मिळाल्यानंतर घरे ही बांधून पूर्ण झाली. शासकीय अधिका—यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या हक्काच्या घरात प्रवेश केला. या लढयातील अग्रणी कलम पाटील यांची स्मृती जागविण्यासाठी परिसराचे 'कलमानगर' असे नामकरण झाले. सुमारे पन्नास हजार रुपये खर्चाची, उतरत्या छपराची साधारणतः दोनशे चौरस फुटाची ही घरकुले आहेत. वीस हजार लिटर पणी साठू शकेल असे आयताकृती खड्डे खणले आहेत. प्रत्येक भूखंडाचे क्षेत्रफळ १३०० चौरस फुट आहे. घर बांधण्यासाठी वापरलेल्या बाबूंवर रासायनिक प्रक्रिया केलेली आहे. किमान ५० वर्षे या घरांना धोका नाही. पुण्यातील 'सोपेकॉन' या सेवाभावी संस्थेने पर्यावरण पूरक अशी घरकूले उभारली आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात परित्यक्तांचा प्रश्न जास्त बिकट आहे. पूर्वीच्या संयुक्त कुंटुंब पध्दतीत त्या सांभाळल्या जात पण शहरीकरण, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आता खेडे ही बदलेले आहे. अशा सामाजिक परिस्थितीत परित्यक्ता स्त्रियांची स्थिती खुप सुधारली आहे असे म्हणता येणार नाही. पण स्वतःच्या हक्काचे घर मिळविले ही आतापर्यंत झालेल्या विविध चळवळीतून साकारलेले एक महत्वपूर्ण फलीत आहे असे मात्र म्हणता येईल.

स्त्रिया आणि विकास या संदर्भात विचार करताना स्त्रिया, स्वयंसेवी संस्था आणि विकास हा संपूर्णपणे झालेला आहे. असे म्हणता येणार नाही पण अजिबातच झालेला आहे, असे म्हणता येणा नाही. त्यामुळे संघटीतपणे विकासाच्या दिशेने मार्गक्रमण केले तर यश मिळतेच. हे खरे आहे. म्हणून उशीरा का होईना न्याय हा मिळतोय. असा सकारात्मक विचार करणे व ते स्विकारणे हे केव्हाही चांगले असते.

**संदर्भ :**


१) आपटे ज.शं.रोडे पुष्पा, : भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन पूणे २००८

२) डॉ.पाटील उषा, परित्यक्ता : व्यथा आणि वास्तव, अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर २०१२

३) महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा, वस्तुस्थितीचे विश्लेषण १९८१—९५ महाराष्ट्र राज्य, महिला आयोग, गृहनिर्माण भवन, मेझॅनिक फ्लोअर बांद्रा (पूर्व) मुंबई — १९९८

४) शहा घनश्याम अनुवाद — प्रा.योगिनी वेंगुर्लेकर, सामाजिक चळवळी आणि सरकार डायमंड पब्लिकेशन, पूणे २००९